जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -५२१ दिनांक - १०/०७/२०२३**

## मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर

## रिक्षा चालकाची इमानदारी व पोलीसांसह समन्वय...

## हरवलेला ३५,०००/- रु. किंतीचा आय फोन कंपनीचा मोबाईल मिळाला परत

मुंढवा-केशवनगर भागामध्ये रिक्षा चालक म्हणून काम करणारे श्री.संतोष किसनराव शिंदे, रा. सागर निवास, लोणकर चौक, केशवनगर, मुंढवा पुणे यांनी मुंढवा ते आर.बी. स्कुल, केशवनगर असा ग्राहकास त्यांचे सांगणे प्रमाणे सोडले. प्रवास झाल्यानंतर प्रवाशी व रिक्षा चालक यांचे आपसात भाड्याचे देणे घेणे झाले. त्यानंतर संतोष शिंदे हे आपली रिक्षा घेवून पुढील ग्राहकाची वाट पाहत रस्त्याचे कडेला थांबले होते. यादरम्यान रिक्षाचे मागील सिटवर त्यांची नजर गेली. तेव्हा त्यांना एक मोबाईल (स्मार्ट फोन) दिसला तेव्हा त्यांनी थोड्यावेळापुर्वी ग्राहक सोडलेल्या ठिकाणी जावून आजू बाजूस त्या ग्राहकाचा शोध घेतला, परंतू ते ग्राहक मिळून आले नाही. त्यामुळे रिक्षा चालक शिंदे यांनी सदरचा मोबाईल फोन मुंढवा पोलीस ठाणे येथे प्रामाणीकपणे ठाणे अंमलदार सहा. पोलीस निरीक्षक, राजू महानोर यांचेकडे जमा केला. रिक्षा चालक शिंदे यांचेतील प्रामाणिकपणा व ईमानदारी जिवंत असल्याने एवढया मोठया स्मार्ट फोनच्या मोहास बळी न पडता त्यांचेतील माणुसकी व प्रामाणिकपणामुळे त्यांना सापडलेला मोबाईल बंद न करता पोलीस ठाणेस आणून जमा केला.

पोलीस ठाणेस जमा केलेल्या मोबाईलवर फोन आल्यावर श्री. महानोर यांनी मोबाईलवरील कॉल स्विकारुन समोरच्या व्यक्तीस घडलेली हकीगत सांगितली. त्यावरुन सदरच्या मोबाईलच्या मालकाची माहिती घेवून सदरचा मोबाईल सापडला असून सदरचा मोबाईल हा मुंढवा पोलीस ठाणे येथे जमा असल्याचे कळविण्यास सांगितले. त्याप्रमाणे माहिती घेवून मोबाईल मालक एक महिला रा. केशवनगर, मुंढवा, पुणे मुळ पत्ता हैद्राबाद यांना बोलावून सदर मोबाईलची खात्री करुन सदरचा आय फोन कंपनीचा मोबाईल फोन अंदाजे किंमत ३५,०००/- रुपयेचा त्यांना परत करण्यात आला आहे.

तदनंतर रिक्षा चालक संतोष किशनराव शिंदे यांचे चांगले कामगिरी बदल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रदीप काकडे यांनी कौतूक करुन त्यांचा श्रीफळ व फुलांचा गुच्छ देवून सत्कार केला.